## सुट्टीतील एम.एड्. २०१२-१४ समारोप



सुट्टीतील एम.एड्. निरोप समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ.वि.ल. धारूरकर यांचे स्वागत करतांना विभाग प्रमुख डॉ. शोभना जोशी.



सुट्टीतील एम.एड्. निरोप समारोप प्रसंगी एम.एड. प्रशिक्षणार्थी आपले मनोगत व्यक्त करतांना.



सुट्टीतील एम.एड. २०१३-१५ च्या समारोप समारंभाप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. झांबरे (संचालक बी.सी.यू.डी.), विभागप्रमुख डॉ. शोभना जोशी.

### तीळगुळ वाटप



मकर संक्रांतीनिमित्त शिक्षणशास्त्र विभागात तीळगुळ वाटप करतांना विभाग प्रमुख डॉ. शोभना जोशी.

### क्रीडा स्पर्धा



क्रीडा स्पर्धेमध्ये गोळा फेक स्पर्धेमध्ये गोळा फेकताना एम.एड्. प्रशिक्षणार्थी श्रीमती शारदा पाटील.



क्रीडा स्पर्धेमध्ये गोळा फेक स्पर्धेमध्ये गोळा फेकताना एम.एड्. प्रशिक्षणार्थी कु. रिना गोखले.

### SPSS कार्यशाळा



संशोधन कार्यशाळेत SPSS सॉफ्टवेअर वर मार्गदर्शन करतांना डॉ. एस.एल. सनान्से.



संगणक कक्षामध्ये संगणकावर प्रात्यक्षिक करतांना एम.फिल्. प्रशिक्षणार्थी.

# विभाग - १

# शिक्षणशास्त्र विभागाचा वार्षिक अहवाल

## ✲ शिक्षणशास्त्र विभागाचा वार्षिक अहवाल ✲

**विद्यापीठ वर्धापन दिन (Open Day )- २२ ते २३ ऑगस्ट २०१३**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, शिक्षणशास्त्र विभाग येथे २२ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट २०१३ या दोन दिवशी विद्यापीठ वर्धापन दिन (Open day) निमित्त वेगवेगळया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. .

**पहिला दिवस -२२ ऑगस्ट २०१३**

**या दिवशी सर्वप्रथम सकाळी ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय (History Musium) येथे झेंडावंदन करण्यात आले.**

**१) रक्तदान शिबीर -** ११:०० ते २:०० या वेळेत शिक्षणशास्त्र विभाग व शरीरिक शिक्षणशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षणशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. शोभना जोशी यांनी स्वतः रक्तदान करून या रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. एम.एड्. व एम.फिल्. तसेच शारीरिक शिक्षणशास्त्र विभागाच्या काही विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग घेऊन रक्तदान केले.

**२) घोषवाक्य स्पर्धा -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त शिक्षणशास्त्र विभागामध्ये घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन दि.२२.०८.२०१३ व २३.०८.२०१३ रोजी करण्यात आले. घोषवाक्य स्पर्धेसाठी १) प्राथमिक शिक्षण २) माध्यमिक शिक्षण ३) उच्च शिक्षण ४) पर्यावरण शिक्षण ५) विशेष शिक्षण ६) शिक्षक शिक्षण ७) लोकसंख्या शिक्षण ८) शारीरिक शिक्षण व ९) आरोग्य शिक्षण हे विषय होते. घोषवाक्य स्पर्धेच्या संयोजिका श्रीमती सांत्वना मिश्रा यांनी दि. २२.०८.२०१३ रोजी स्पर्धा घेण्यामागील भूमिका तसेच महत्व व उद्देश काय याची सर्व विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. दि. २२ व २३ रोजी सर्व स्पर्धकांकडून घोषवाक्य स्विकारण्यात आली. घोषवाक्य स्पर्धा ही तीन भाषांमधील घोषवाक्यांसाठी घेण्यात आली. मराठी, हिंदी व इंग्रजी या तीनही भाषांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले. घोषवाक्य स्पर्धेमध्ये खालील स्पर्धकांनी पारितोषिके मिळविली.

**मराठी भाषा :- प्रथम** - साधना बनसोड (एम.फिल्., शिक्षणशास्त्र), **द्वितीय** - प्रभाकर कराड (एम.फिल्.), **तृतीय** - कुंभार नितीन (एम.फिल्. हिंदी)

**इंग्रजी भाषा :- प्रथम** - स्वाती झगेकर (एम.एड्.), **द्वितीय** - रुथ इंगल्स (एम.एड्.), **तृतीय** - तुळशिराम खोटरे (एम.फिल्. शिक्षणशास्त्र)

**हिंदी भाषा :- प्रथम** - कल्पना गायकवाड (एम.फिल्.),

स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या स्पर्धकांना ०५ सप्टेंबर या शिक्षकदिनी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. शोभना जोशी तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

**दुसरा दिवस -२३ ऑगस्ट २०१३**

विभागासमोरील प्रांगणामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. यात परदेशी विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला होता. वृक्षारोपन कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. यु.पी.भडंगे व मिश्रा मॅडम यांनी वृक्ष लागवड करुन केले. शारीरिक शिक्षण विभागाचे विभागप्रमुख डॉ. चंद्रशेखर वृक्षारोपण कार्यक्रमात उपस्थित होते. प्रशिक्षणार्थ्यांनी प्रत्येकाने स्वतः सोबत आणलेली झाडे विद्यापीठ परिसरात लावली.

**२) चालता बोलता प्रश्नमंजुषा -** २३ ऑगस्ट २०१३ या रोजी दुपारच्या सत्रात चालता बोलता प्रश्नमंजुषा हा कार्यक्रम सामूहिक पध्दतीने घेण्यात आला. तीन प्रश्नांची अचूक उत्तरे दिल्यास स्वामी विवेकानंदाचे पुस्तक बक्षीस म्हणून देण्यात आले. या कार्यक्रमास वेगवेगळ्या विभागाच्या विद्यार्थ्यांनी व विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी भरपूर प्रतिसाद दिला. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांची बौध्दिक व वैचारिक

क्षमता विकसित झाली. अशा पध्दतीने २२ व २३ ऑगस्ट २०१३ या दोन दिवशी वर्धापन दिवस मोठ्या हर्षोल्हासाने साजरा करण्यात आला.

## आजी -माजी विद्यार्थी मेळावा - दि. २९ ऑगस्ट २०१३

शिक्षणशास्त्र विभागात दि. २९ ऑगस्ट २०१३ रोजी भेटीनिमित्त, आजी-माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. (याप्रसंगी आजी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्र संचालन एम.एड्. प्रशिक्षणार्थी राहुल चंद्रे यांनी केले.- तसेच कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी व विद्यामान व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गणेश शेटकरसर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच अध्यक्ष स्थान अधिष्ठाता तथा विभाग प्रमुख डॉ. शोभना जोशी यांनी भूषवले.

या प्रसंगी भित्तीपत्रकांचे विमोचन करण्यात आले. तसेच डॉ. गणेश शेटकर सरांनी शिक्षणशास्त्र विभागाच्या ग्रंथालयासाठी विश्वकोशाचे संच भेट दिले. गुणवंत विद्यार्थ्यांचा विभागामार्फत सत्कार करण्यात आला. २०१३-१४ या वर्षातील एम. एड्. प्रशिक्षणार्थ्यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत व सत्कार केला. अध्यक्षीय भाषणाने समारोप झाला. या कार्यक्रमासाठी आजी-माजी विद्यार्थी व विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. आभार प्रदर्शन (एम.एड्. प्रशिक्षणार्थी) सचिन गवळी याने केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## डॉ. राधाकृष्णन जयंती (शिक्षक दिन)- ५ सप्टेंबर

शिक्षणशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. शोभना जोशी मॅडमच्या मार्गदर्शनाखाली ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथपाल डॉ. धर्मराज वीर सर तसेच वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. लोखंडे हे होते. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. शोभना जोशी यांनी पुष्पगुच्छ देवून केले. शिक्षकदिनाचे औचित्य साधून उल्लेखनीय कामगिरी केलेल्या पुढील शिक्षकांना **'शिक्षक गौरव पुरस्काराने'** सन्मानित करण्यात आले.

१) **डॉ. क्रांती व्यवहारे** - सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख - संस्कृत विभाग

२) **डॉ. अपर्णा अष्टपुत्रे** - सहाय्यक प्राध्यापक - मानसशास्त्र विभाग

३) **डॉ. मदनलाल सूर्यवंशी** - सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख - भूगोल विभाग

या कार्यक्रमामध्ये घोषवाक्य स्पर्धेच्या पारितोषीकांचे वितरण करण्यात आले. इंग्रजी, हिंदी व मराठी अशा तीनही भाषांमधील स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषीकांचे वितरण करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ. धर्मराज वीर यांनी या प्रसंगी मार्गदर्शन केले. ग्रंथालयातील विविध पुस्तकांची माहिती व ग्रंथालयातील सुविधांविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. पाठक सर यांनी लिहिलेल्या **'संशोधन आराखडा'** या पुस्तकाचा संच भेट दिला. डॉ. जोशी मॅडम यांनी सुध्दा आपल्या अनमोल वाणीतून मार्गदर्शन केले. एम.एड्. प्रशिक्षणार्थी व एम.फिल्. प्रशिक्षणार्थी यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या विषयीचे आपले विचार मनोगतातून व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल चंद्रे यांनी केल, सुत्रसंचालन रेखा बोर्डे यांनी केले व आभार प्रदर्शन एम.एड्. प्रशिक्षणार्थी सचिन गवळी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**संशोधन कार्यशाळा**

### १) संशोधन आराखडा लेखन कार्यशाळा - ४ ते ६ सप्टेंबर २०१३

विद्यार्थ्यांना समस्या निश्चिती व संशोधन आराखडा तयार करण्यासंदर्भात मार्गदशन करण्यासाठी ४ व ६ सप्टेंबर २०१३ या दिवशी संशोधन आराखडा लेखन कार्यशाळा घेण्यात आली.

पहिल्या दिवशी ४ सप्टेंबर रोजी सकाळी ११:०० ते २:०० या सकाळच्या सत्रात विभागाच्या अध्यापकांमार्फत तात्विक भागावर मार्गदर्शन करण्यात आले. यात डॉ. पाठक सरांनी संशोधन समस्या, शिर्षक व डॉ. एस. व्ही. जोशी मॅडम यांनी संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहीतके, परिकल्पना, तसेच प्रा. मिश्रा मॅडम यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाची कार्यात्मक व्याख्या, गरज, महत्त्व, व्याप्ती व मर्यादा तसेच कार्यपध्दती, जनसंख्या, न्यादर्श, साधने व महितीचे सांख्यिकीय विश्लेषण, यावर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी ६ सप्टेंबर २०१६ रोजी डॉ. भडंगे मॅडम यांनी संशोधनाच्या पध्दती, डॉ. पगारे सर यांनी जनसंख्या नमुना व संशोधनाची साधने याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच संदर्भसूची आणि अंदाजपत्रक याची माहिती दिली. अशाप्रकारे कार्यशाळेत सकाळच्या सत्रात अध्यापन व दुपारच्या सत्रात मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली आराखडा करवून घेण्यात आला.

### २) संशोधन साधननिर्मिती कार्यशाळा - १४ ते १८ आक्टोबर २०१३

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत शिक्षणशास्त्र विभागात दि. १४/१०/१३ ते १८/१०/१३ पर्यंत संशोधन साधन निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत दि.१४/१०/२०१३ रोजी ११ ते १२ या वेळेत डॉ. चिंचोलीकर मॅडम यांनी प्रश्नावली व मतावली या साधनाविषयी मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी प्रश्नावलीची व्याख्या, वैशिष्ट्ये, फायदे, प्रकार, पायऱ्या तसेच प्रश्नावली तयार करतांना घ्यावयाची काळजी व विषयी मर्यादा याविषयी मार्गदर्शन केले. दि.१५/१०/२०१३ रोजी डॉ. अवचार मॅडम यांनी समाजमिती तंत्राविषयी मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी समाजमिती तंत्राची उद्दिष्ट्ये, व्याख्या, पध्दती, मर्यादा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच दुपारील सत्रात दि. १५/१०/२०१३ रोजी डॉ.अपर्णा अष्टपुत्रे मॅडम यांनी मानसशास्त्रीय चाचण्यांतीले (Psychological Test) अभिवृत्ती मापिका या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दि. १७/१०/२०१३ रोजी डॉ. चोंडेकर मॅडम यांनी Rating Scale विषयी मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी Rating Scale पदनिश्चतश्रेणी ची व्याख्या, पद्यनिश्चयन श्रेणीचे पकार, उपयोग, मर्यादा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दि. १७/१०/२०१३ रोजी दुपारील सत्रात प्रा. डॉ. करवंदे सर यांनी मुलाखत या तंत्राविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी मुलाखत तंत्राची व्याख्या, वैशिष्ट्ये, उद्दिष्ट्ये, मुलाखतीचे प्रकार, मुलाखतीचे टप्पे, गुण, मर्यादा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

अशा प्रकारे दि. १४/१०/२०१३ पासून ते दि.१७/१०/२०१३ पर्यंत संशोधन साधन निर्मिती कार्यशाळा चालली. यात संशोधनासाठी उपयुक्त असणाऱ्या प्रश्नावली, मतावली, मापिका, समाजमिती तंत्र, मुलाखत इ. साधनांविषयी महत्वपूर्ण मार्गदर्शन करुन उपयुक्त माहिती दिली. या कार्यशाळेत प्रत्येकाने आपल्या संशोधनासाठी लागणारे साधन बनविले.

### ३) संशोधन अहवाल लेखन कार्यशाळा - दि.३१ डिसेंबर २०१३ ते ०२ जानेवारी २०१४

संशोधन अहवाल लेखन कार्यशाळा दि.३१ डिसेंबर २०१३ ते ०२ जानेवारी २०१४ या दरम्यान आयोजित करण्यात आली होती. दि.३१ डिसेंबर २०१३ रोजी डॉ. सुहास पाठक त्यांनी अहवाल परिचय व प्रास्तावीक, डॉ.भडंगे यांनी सारांशलेखन व प्रा. मिश्रा यांनी संदर्भ विभाग यावर मार्गदर्शन केले. तीनही विषयाच्या मार्गदर्शनानंतर दुपारच्या सत्रात २:३० ते ४:३० या वेळेत गटकार्य केले.

- दि.०१ जानेवारी २०१४ रोजी डॉ. एस.व्ही. जोशी यांनी माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन, संख्याशास्त्राचा उपयोग, डॉ.पा[ठक] यांनी आलेखांचा वापर या विषयी मार्गदर्शन केले व दुपारच्या सत्रात दुपारी २:३० ते ४:३० या वेळेत गटकार्य.
- दि.०२ जानेवारी २०१४ रोजी प्रा.मिश्रा यांनी निष्कर्ष व शिफारशी, डॉ.जोशी यांनी प्रकरण योजना, डॉ. पाठक यांनी क[से] करावे व काय करू नये या विषयी मार्गदर्शन केले व दुपारच्या सत्रात २:३० ते ४:३० या वेळेत गटकार्य.

एकंदरीत अहवाल लेखनात भाषा, प्रकरण योजना, संदर्भ, पृष्ठ क्र. कसे द्यावेत, अहवाल तयार करताना घ्यावयाच्या दक्ष[ता] इत्यादी बाबीवर मार्गदर्शन मिळाले.

## गांधी जयंती

३ ऑक्टो. २०१३ रोजी महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास महात्मा गांधी अध्यासन केंद्राचे अध्[यक्ष] डॉ. दासू वैद्य हजर होते. त्यांनी आपल्या भाषणात गांधीजींचे कार्य व त्याचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. आपल्या अध्यक्षीय समारो[पात] डॉ. शोभना जोशी यांनी गांधीजींना अभिप्रेत असणाऱ्या अहिंसेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

## निबंध स्पर्धा

सहभाग - एम. एड्. व एम. फिल्. प्रशिक्षणार्थी

विषय - १) डॉ.आंबेडकराचे शैक्षणिक योगदान

२) आजचे शिक्षण आणि उद्योजकता

पारितोषिके - **प्रथम - ३०१/-,** द्वितीय - २०१/- व तृतीय - १०१/- रोख रक्कम आणि प्रमाणपत्र.

दि. ०६ डिसेंबर २०१३ ते दि.३१ डिसेंबर २०१३ पर्यंत कालावधी निबंध लेखनासाठी देण्यात आला. या स्पर्धेच्या पारितोषीक[ांचे] वितरण स्वामी विवेकानंद जयंतीच्या कार्यक्रमात भूगोल विभाग प्रमुख डॉ. उकेसर व युवा वक्ते वेदांत कुलकर्णी यांच्या हस्ते करण्[यात] आले.

**प्रथम -** १) तुलशीराम खोटरे - एम.फिल्. - ३०१/-, **द्वितीय -** २) माधव गावित - एम.फिल्. - २०१/-, **तृतीय -** ३) जयश्री शिंदे एम.एड्. - १०१/- व **उत्तेजनार्थ -** १) वर्षा खेडकर - एम. फिल्. आणि २) रेखा बोर्डे - एम. एड्.

## सावित्रीबाई फुले जयंती - ३ जानेवारी

शिक्षणशास्त्र विभागात ६ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ भं[...] मॅडम व सर्व एम.फिल्. व एम.एड्. चे प्रशिक्षणार्थी यांनी सावित्रीबाई फुले यांची जयंतीचे आयोजन दुपारी ३.०० वाजता के[ले.] कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. स्मिता अवचार मॅडम (समाजशास्त्र विभाग) उपस्थित होत्या. अध्यक्षस्थान विभाग प्रमुख [डॉ.] शोभना जोशी मॅडम यांनी भूषविले प्रमुख पाहुण्यांचा परिचय एम.एड्. प्रशिक्षणार्थी जयश्री शिंदे यांनी करुन दिला. एम.एड्. प्रशिक्षणा[र्थी] भारती चतुर्वेदी, प्रभाकर तिडके, तसेच एम.फिल्. प्रशिक्षणार्थी प्रमोद धापसे, वर्षा खेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांन[तर] डॉ. स्मिता अवचार यांनी सर्व प्रशिक्षणार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे महत्त्व विषद केले. डॉ. शोभ[ना] जोशी यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.एड्. प्रशिक्षणार्थी श्रीमती लिना वडनेरे व एम.एड्. प्रशिक्षणा[र्थी] सुनिता पवार यांनी आभार मानले.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**विभागाचा छात्रसेवाकाल हा उपक्रम दोन टप्प्यांमध्ये पार पाडण्यात आला.**

पहिल्या टप्प्यात दि. १७ डिसेंबर ते २१ डिसेंबर दरम्यान जयप्रकाश नारायण अध्यापक महाविद्यालयामध्ये आयोजित आला. उद्‌घाटनाप्रसंगी डॉ. सतीश सातव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जयप्रकाश नारायण अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापकांनी शिक्षणशास्त्र विभागातील प्राध्यापकांचे पुष्प देवून स्वागत केले. यात एम.एड्. प्रशिक्षणार्थ्यांनी बी.एड. च्या अनिवार्य विषयांच्या प्रत्येकी २-३ तासिका व अध्यापनपध्दतीची किमान एक तासिका असे ppt च्या साहाय्याने अध्यापन कार्य केले. यात त्यांना बी.एड्. वरील अध्यापनाचा सराव मिळाला. तसेच प्रत्येक एम.एड्. प्रशिक्षणार्थ्यांकडे बी.एड्. च्या दोन विद्यार्थ्यांच्या दोन अध्यापन पध्दतींची प्रत्येकी दोन पाठ टाचणे तपासण्यासाठी देण्यात आली. त्यानंतर एम.एड्. च्या मार्गदर्शकांनी परत तपासून त्याचे प्रत्याभरण दिले. यातून प्रत्यक्ष पाठ कसे तपासायचे याचे प्रशिक्षण मिळाले.

दुसऱ्या टप्प्यात दि. २३ व ३० डिसेंबर २०१३ हे दोन दिवस हर्सुल येथील न्यू हायस्कूल येथे बी.एड्. च्या सरावपाठ कार्यक्रमात पाठनिरीक्षणांचे आयोजन करण्यात आलेले होते. एम. एड्. प्रशिक्षणार्थ्यांनी ज्या बी. एड्. प्रशिक्षणार्थ्याची जी पाठ टाचणे तपासली होती, त्याच सराव पाठांचे निरीक्षण करण्यास त्यांना सांगण्यात आले होते. यामध्ये त्यांनी मार्गदर्शकांच्या सूचनांनुसार पाठ टाचणात केलेले बदल, सूचनांनुसार अध्यापनात शैक्षणिक साहितयाचा वापर या सर्व बाबींचे निरीक्षण करणे अपेक्षित होते व त्यानुसार आपल्या अहवालात नोंदी करावयाच्या होत्या. तसेच अपेक्षित प्रत्याभरण नोंदवायचे होते.

याप्रमाणे छात्रसेवाकालात भावी शिक्षक प्रशिक्षक या नात्याने पुढील बी.एड्. वर्गांना शिकविण्यासाठी उपयोगी पडतील अशा प्रकारचे अध्ययन अनुभव दिले गले. छात्रसेवाकालाचा समारोप जयप्रकाश नारायण अध्यापक महाविद्यालयात पार पडला. या समारोपास प्रमुख पाहुणे या नात्याने महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सातव होते तर अध्यक्षस्थानी डॉ. शोभना जोशी होत्या. समारोपप्रसंगी बी. एड्. महाविद्यालयाला विभागातर्फे स्वामी विवेकानंदांच्या पुस्तकांचा संच भेट देण्यात आला व प्रत्येक विद्यार्थ्याला एक पुस्तक भेट देण्यात आले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन

शिक्षणशास्त्र विभागातर्फे १५ जानेवारी २०१४ रोजी राजमाता जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, विद्यापीठ नामविस्तार दिन, भूगोल दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन दुपारी १२.०० वो करण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे भूगोल विभागप्रमुख डॉ ऊकेसर हे होते आणि मा. वेदांत कुलकर्णी जालना हे युवादिनानिमित्त वक्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. शोभना जोशी यांनी भूषविले सर्वप्रथम प्रतिमा पुजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली.

## राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद, यांच्या जयंती निमित्त शिक्षणशास्त्र विभागातील प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंदावरील भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. मा. वेदांत कुलकर्णी यांनी 'युवक कसा असावा' या विषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर विभाग प्रमुख डॉ. शोभना जोशी मॅडम यांनी आम्हाला मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन जयश्री शिंदे यांनी केले.

## भूगोल दिन

भूगोल दिन, विद्यापीठ नामविस्तार दिन व मकर संक्रांतीच्या दिनाचे महत्त्व एम. एड्. व एम. फिल्. प्रशिक्षणार्थ्यां आपआपल्या विचारातून मांडले. यामध्ये एम.फिल्. चे तुळशीराम खोटरे, गावीत, वर्षा खेडकर, एम. एड्. प्रशिक्षणार्थी सानप यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर डॉ. ऊके सरांनी भूगोल दिन या विषयावर मागदर्शन केले. एम. फिल्. प्रशिक्षणार्थी श्री. गुट्टे यांनी मकरसंक्रमण या विषयावर ppt सादर केली. मकरसंक्राती निमीत्त मकर संक्रमण संकल्पना समजावून दिली. मकर संक्रांतीनिमित्त जोशी मॅडम यांनी सर्व प्रशिक्षणार्थ्यांना तिळगुळाचे लाडु देवून आशीर्वाद दिले.

यानिमित्त निबंधस्पर्धेच्या विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.एड्. प्रशिक्षणार्थी राहुल यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## State level Workshop on Use of Computer in Research

### 1. Use of ICT in Research

दि.२०.०३.२०१४ या रोजी शिक्षणशास्त्र विभागामध्ये अभ्यासक्रमावर आधारित एम.एड्. व एम.फिल् च्या विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या दिवशी 'Use of ICT in Research' ही कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत पुणे येथील श्रीमती प्रिया कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पहिल्या सत्रात मॅडमनी प्रत्यक्ष संगणकाचा वापर संशोधनात केव्हा व कसा करावा हे वेब टू (web२) टूल च्या प्रात्यक्षिकांसह समजावून दिले. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा उपयोग शैक्षणिक संशोधनामध्ये करण्याविषयीचे मार्गदर्शन केले व नंतर प्रात्यक्षिक करवून घेतले.

### 2. Use of SPSS in Research

दि. २१/०३/२०१४ कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाचे डॉ. एस.एल सनान्से यांनी पहिल्या सत्रात संशोधनात एसपीएसएस पॅकेजचा वापर कसा करावा हे सांगितले. त्यानंतर दुपारच्या सत्रात प्रत्यक्ष संगणकाच्या मदतीने संख्याशास्त्रातील उदाहरणे कशी सोडवता येतील याचे प्रात्याक्षिके करवून घेतले आणि विद्यार्थ्यांकडून संगणकाच्या मदतीने **एस.पी.एस.एस.** पॅकेजचा वापर करून संख्याशास्त्रातील सांख्यिकीय विश्लेषण कशा प्रकारे करावे याचे प्रात्याक्षिकांसह मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडूनही सांख्यिकीय विश्लेषणाचे प्रात्याक्षिक करवून उदाहरणे सोडवून घेतली. त्यामुळे विद्यार्थ्यांना लवकर आकलन होण्यास मदत झाली. विभागप्रमुख डॉ. शोभना जोशी यांनी अध्यक्षीय समारोप केला.

### 3. Use of Statistics in Research

दि. २२/०३/२०१४ या रोजी कार्यशाळेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संख्याशास्त्र विभागाचे प्र डॉ. एस.एल. सनान्से यांनी संख्याशास्त्रातील शंका दूर करुन विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवल्या संशोधनामध्ये संख्याशास्त्राचा जास्तीत जास्त उपयोग करुन संशोधन परिपूर्ण कसे होईल या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच दुसऱ्या सत्रात संगणकाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांकडून प्रात्याक्षिके करुन घेतली. विभागप्रमुख डॉ. शोभना जोशी यांनी कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप केला.

## क्रीडा दिन

शिक्षणशास्त्र विभागात स्पोर्टस् डे दि. २५ जानेवारी २०१४ रोजी साजरा करण्यात आला. या दिवशी इनडोअर आणि आऊटडोअर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठातील शारीरिक शिक्षणशास्त्र व क्रीडा विभागाच्या मैदानावर क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. मुलांच्या व मुलींच्या १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेपासून खेळाचा शुभारंभ करण्यात आला. या खेळात एम.फिल्. आणि एम.एड्. मधील प्रशिक्षणार्थ्यांनी उत्साहपूर्वक व हिरीरीने सहभाग घेतला. नंतर थाळी फेक, गोळा फेक, भाला फेक या खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

इनडोअर स्पर्धेसाठी शिक्षणशास्त्र विभागात बुध्दीबळ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व क्रीडा स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे आयोजन डॉ. एस. व्ही. जोशी विभाग प्रमुख आणि डॉ. प्रशांत पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शारीरिक शिक्षण विभागातील शिक्षक व प्रशिक्षक यांनी स्पर्धेचे परीक्षण करुन सहकार्य केले. स्पोर्टस् डे यशस्वीरीत्या पार पडला.

स्पर्धेचा निकाल

| खेळ | क्रमांक | मुले | मुली |
|---|---|---|---|
| धावणे १०० मीटर | प्रथम | धापसे प्रमोद प्रकाशराव | गोखले रिना |
| | द्वितीय | काळे निपुन मधुकरराव | पवार सुनिता |
| | तृतीय | झहुर वाणी | कांबळे स्वाती |
| भालाफेक | प्रथम | धापसे प्रमोद प्रकाशराव | - |
| | द्वितीय | सय्यद हुसेन | - |
| | तृतीय | जेटिथोर समाधान | - |
| थाळी फेक | प्रथम | फंदे नितिन | झगेकर स्वाती |
| | द्वितीय | धापसे प्रमोद प्रकाशराव | सुतार बेनझीर |
| | तृतीय | सय्यद हुसेन रजवी | गोखले रिना |
| गोळा फेक | प्रथम | काळे निपुन | झगेकर स्वाती |
| | द्वितीय | धापसे प्रमोद | पवार सुनिता |
| | तृतीय | झहुर वाणी | कांबळे स्वाती |
| बुध्दीबळ | प्रथम | धापसे प्रमोद प्रकाशराव | सुतार बेनझिर |
| | द्वितीय | गुट्टे हनुमंत रघुनाथराव | स्वाती कांबळे |

तसेच विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. शोभना जोशी यांनी विद्यार्थ्यांना खेळाडू वृत्तीचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विभागप्रमुख तसेच विभागातील सर्व प्राध्यापकांनी प्रयत्न केले.

## सांस्कृतिक कार्यक्रम

दि. २८/०३/२०१४ या रोजी शिक्षणशास्त्र विभागात सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षातील एम.एड्. व एम.फि प्रशिक्षणार्थ्यांच्या विविध कलागुणानां वाव देण्यासाठी सकाळी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी काव्यवा विनोद, गीते, नाटिका सादर केल्या. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या समारोपानंतर सर्व विद्यार्थ्यांनी स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला.

## जागतिक महिला दिन आणि निरोप समारंभ

दि. २८/०३/२०१४ या रोजी दुपारच्या सत्रात विभागामध्ये जागतिक महिला दिन आणि निरोप समारंभ घेण्यात आला. प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विजया केदार शासकीय अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई आणि प्रा. सुनिता नगरकर यांची प्र उपस्थिती होती. यावेळी एम.एड्. आणि एम.फिल्. च्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. सुनिता नगरकर यांनी जागति महिला दिन व महिलांचे कर्तृत्त्व यावर मार्गदर्शन केले आणि डॉ. विजया केदार यांनी पुढील भावी जीवनाविषयी व शैक्षणिक कार्यात निष्ठेबद्दल अनमोल मार्गदर्शन केले.

निरोप समारंभाचे औचित्य साधून विभागातील विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके देण्यात आली.

| अ. क्र. | पारितोषिकाचे नाव | पारितोषिक प्राप्त एम.फिल्. विद्यार्थी | पारितोषिक प्राप्त एम.एड्. विद्यार्थी |
|---|---|---|---|
| 1 | **The Student of the year Award** | गुट्टे हनुमंत रघुनाथराव | - |
| 2 | **The Outstanding Performance Award** | गुट्टे हनुमंत रघुनाथराव | - |
| 3 | **The All rounded Player Award** | धापसे प्रमोद प्रकाशराव | - |
| 4 | **The All Rounder Student's Award** | १) खोटरे तुळशीराम चिमण<br>२) खेडकर वर्षा भागवत | रामटेके अमरदीप लालाजी |
| 5 | **The most Regular Student's Award** | प्रथम - गावित माधव हरी | प्रथम - झगेकर स्वाती बालासाहेब |
| | | द्वितीय - गायकवाड कल्पना भानुदास | द्वितीय - गोखले रिना व्यंकटराव |
| | | तृतीय - जोगदंड प्राजला प्रकाश<br>रामटेके वैशाली एकनाथ | तृतीय - गायके अर्चना नामदेव |
| 6 | **The Active Student's Award** | १) वाहूळे संदिप प्रताप | १) वडनेरे लिना पुरुषोत्तम |
| | | २) झाकडे अर्चना प्रल्हाद | २) पाटील शारदा वनवासराव |
| | | ३) गावित माधव हरी | ३) जेटिथोर समाधान अण्णाराव |
| | | - | ४) तिडके प्रभाकर भीमराव |
| | | - | ५) शिंदे अमोल जयराज |
| | | - | ६) शिंदे जयश्री प्रल्हाद |
| | | - | ७) चंद्रे राहूल |
| 7 | **The Humble Student's Award** | - | १) अहमद मुझम्मिल जी. |
| | | - | २) इश्तियाक अहमद दार अब. |
| | | - | ३) मोहम्मद अशरफ भट |
| | | - | ४) राथेर सजाद युसूफ मोहम्मद युसूफ |
| | | - | ५) वाणी अ. रशिद अ. गणी वाणी |
| | | - | ६) वाणी जहूर जी. मोहम्मद वाणी |
| 8 | **The Hard Working Student's Award** | - | १) मेश्राम रोशन दादाजी<br>२) जावळे शिल्पा यशवंता |